जा.क्र./५७/२०२६-२७
कागल नगरपरिषद कागल
दिनांक -१८/०५/२०२६

# कागल नगरपरिषद कागल
## जाहीर ई – निविदा
## (आरोग्य विभाग)

१५ वा वित्त आयोग अंतर्गत प्राप्त झालेल्या अनुदानातुन स्थायी समिती सभा ठराव नं ०८ दि.२२/०४/२०२६ नुसार खालील कामाकरीता मुख्याधिकारी, कागल नगरपरिषद कागल, जिल्हा कोल्हापूर दुरध्वनी क्रमांक ०२३२५ – २४५६७८ हे नोंदणीकृत मक्तेदारा कडुन दोन लिफाफा पध्दतीने खालील कामाच्या ई – निविदा मागवित आहेत. ई-निविदेचा कोरा नमुना http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १९/०५/२०२६ रोजी १६.०० वाजले पासुन दिनांक २८/०५/२०२६ रोजी १६ .०० वाजे पर्यंत उपलब्ध राहतील. परिपुर्णरित्या भरलेल्या ई-निविदा दि. १९/०५/२०२६ रोजी १६ .०० वाजले पासुन ते दिनांक २८/०५/२०२६ रोजी १६ .०० वाजे पर्यंत वा त्यापुर्वी स्विकारण्यात येतील. प्री-बिड मीटिंग दिनांक २२/०५/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता मुख्याधिकारी यांच्या दालनात होईल. तसेच ०१ ते ०२ या कामाच्या सर्व शर्ती अटी नगरपरिषद कार्यालयामध्ये पाहावयास मिळतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. | बयाणा रक्कम रु. १% | काम पुर्ण करणेची मुदत | निविदा डाऊनलोड करणेची किंमत रुपये | मक्तेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ६ | ७ | ८ |
| | स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत प्राप्त झालेल्या बक्षीस अनुदानातुन | | | | | |
| १ | नागरी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरातील घनकचरा संकलित करणे, पावडर फवारणी करुन भरणी व वाहतुक करणे, व्यापार संकलित, मृत पशुंची विल्हेवाट लावणे. (एकूण अंदाजित साफ सफाईचे क्षेत्रफळ ३,३०,०००/-चौ.मी., एकुण अंदाजित कचरा उठाव २० ते २५ मे.टन.) (सन २०२६ – २०२७) व कागल नगरपरिषद हद्दी मध्ये कागल शहरातील दैनंदिन रस्ते सफाई करणे, तसेच, रस्तेलगत असणा-या दोन्ही बाजुच्या गटर सफाई करणे, शहरातील कच्चे गटर व नाले सफाई करणे, तसेच इतर अनुषंगिक कामे करणे. (सन २०२६ – २०२७) | 2,66,03,703/- | 2,66,037/- | १२ महिने | ५,०००/- | नगरपरिषदे साठी काम करणारे सर्व अनुभवी व नगरपरिषदे कडील नोंदणीकृत ठेकेदार |
| २ | रि.स.नं. ४०६ गांडुळ खत निर्मिती करणे. (२० ते २५ मे.टन पैकी ओल्या कच-यावर प्रक्रिया करणे) तसेच इतर अनुषंगिक कामे करणे. (सन २०२६ – २०२७) | 42,44,184/- | 42,442/- | १२ महिने | २,५००/- | |

१) उपरोक्त सर्व कामाबाबत निविदा अटी व शर्ती इ. बाबतचा तपशिल निविदा संचामध्ये नमुद केला असुन को-या निविदा संच http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. १९/०५/२०२६ रोजी १६ .०० वाजले पासुन दिनांक २८/०५/२०२६ रोजी १६ .०० वाजेपर्यंत ऑनलाईन पहावयास मिळतील.
२) उपरोक्त तक्त्यातील कामाचे नावा समोर रकाना क्र. ४ व ७ मध्ये नमुद रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरणेची आहे. सदर रक्कम http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर वरुन दिनांक १९/०५/२०२६ रोजी १६ .०० वाजले पासुन दिनांक २८/०५/२०२६ रोजी १६ .०० वाजे पर्यंत भरता येतील.
३) ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेल्या निविदा शक्यतो दिनांक २९/०५/२०२६ रोजी १६ .०० वाजता मुख्याधिकारी कागल नगरपरिषद, कागल यांचे कार्यालयात उपस्थित मक्तेदार अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीचे उपस्थितीत उघडणेत येतील.
४) निविदेच्या अटी शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदापैकी, एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखुन ठेवला आहे.

Scanned with OKEN Scanner

…खतनिर्मिती व ग्रीन बॉक्स तंत्रज्ञाना मधील कामे यापुर्वी केले असल्याचा किमान ५ वर्षे किंवा त्यापेक्षा दाखला / परवाना निविदे सोबत जोडणे आवश्यक आहे

…याच्या कामाची स्थानिक स्तरावरील आवश्यक ती सर्व माहिती व स्थळ पाहणी करुन त्याप्रमाणे न.प. कडुन दाखला घेवूनच निविदा भरावयाची

…दर कामी मंजुर मक्तेदार यांनी योग्य त्या किंमतीच्या स्टॅम्प वरती करार पत्र करुन देणेचे आहे., सुरक्षा ठेव /बँक गॅरंटी म्हणुन बिलातुन रक्कम कपात करणेत …ईल.

८) नोंदणी प्रमाणपत्र/shop act license, बयाणा रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरणा केले नंतर प्राप्त होणारी पावती, पॅनकार्ड, आयकर प्रमाणपत्र मागील ३ वर्षाचे, परिशिष्ट अ

९) मक्तेदार यांनी आवश्यक ते शासकीय कर, इन्कम टॅक्स, व्हॅट, जीएसटी, प्रायव्हेडेट फंड इ. कागदपत्रे जमा करणे बंधनकारक आहे.

१०) मक्तेदार यांनी शासन निर्देश, पर्यावरण विभाग, प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे कडील आणि वेळोवेळी पारित होणारे न्यायालयीन आदेश यांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील. तसेच नगरपरिषद आरोग्य विभागाकडे ठेकेदार नोंदणी असणे आवश्यक आहे.

११) निविदा कामकाजाच्या स्वरुपातील अटी व शर्ती आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार नगरपरिषदेने राखुन ठेवले आहेत. तसेच नगरपरिषद कोणतेही कारण नमुद न करता अथवा असे कारण न देता कमी किंवा जास्त दराची आलेले निविदा स्विकारणेचा अथवा फेटळणेचा अधिकार नगरपरिषदेने राखुन ठेवला आहे.

१२) उपरोक्त प्रमाणे नमुद दोन लिफाफा ऑनलाईन पध्दतीने निविदा अपलोड करुन सादर करावी लागेल. निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ बंधनकारक राहील.

१३) निविदेसोबत शुध्दीपत्रक काढण्याची गरज भासल्यास ते http://mahatendres.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

१४) आर्थिक बोलीच्या लिफाफ्यामध्ये दर अंकात व अक्षरामध्ये लिहिण्यात यावे, तसेच मक्तेदाराने निविदेमधील दर सर्व शासकीय करासह देणेचे आहे.

१५) महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ व महाराष्ट्र लेखा संहिता २०१३ व स्थायी निर्देश मधील तरतुदी मक्तेदारास बंधनकारक राहतील.

१६) सदरचे काम हे घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ नुसार व नगरपरिषद सुचनेनुसार करणेचे आहे.

१७) निविदेचा कालावधी १२ महिने इतका असून मा स्थायी निदेश क्रमांक 36 नुसार मक्तेदाराचे काम समाधानकारक रित्या असल्यास मा. सर्वसाधारण सभेच्या अथवा मा. प्रशासकसो कागल नगरपरिषद यांच्या मंजूरीने पुढील मुदतवाढ देणेत येईल तथापी मा. मुख्याधिकारी कागल नगरपरिषद कागल यांचा निर्णय अंतिम राहील.

१८) वाहनाचे नोंदवही ठेवणे आवश्यक राहील. तसेच सदर कामाकरिता नगरपरिषदकडील घंटागाडी वाहने वापरणे बंधनकारक राहील. तसेच अतिरिक्त लागणारे सर्व वाहनांची व्यवस्था ठेकेदाराने करणे बंधनकारक राहील, तसेच वाहनावर लागणारे मनुष्यबळ, वाहनाची दुरुस्ती, देखभाल (अंदाजित खर्च ५०००/- प्रति एक वाहन) ठेकेदाराने करणेचा आहे. तसेच नगरपरिषद कडील घंटागाडी साठी प्रतिमहा १०,०००/- इतके भाडे मासिक बिलातून कपात करण्यात येईल.

१९) ओला कचरा प्रक्रिया करुन विजनिर्मिती (ग्रीनबॉक्स), खतनिर्मिती करणे, सुका कचरा शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करणे बंधनकारक राहील. तसेच याकरिता मनुष्यबळ पुरविणे बंधनकारक राहील.

२०) मक्तेदाराने निविदा दोन लिफाफा पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे. लिफाफा क्र. १ मध्ये मक्तेदार नोंदणी प्रमाणपत्र, लेबर कॉन्ट्रक्टर रजिस्टर प्रमाणे कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (EPF) नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड स्कॅन केलेली प्रत व निविदा सुचने मधील इतर आवश्यक बाबी. व लिफाफा क्र. २ मध्ये मक्तेदाराने आपले दर विहित BOQ मध्ये योग्य त्या जागी भरुन सदरची BOQ लिफाफा क्र. २ मध्ये अपलोड करावी. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या निविदेचे दर इतर कोठेही नमुद करण्यात येऊ नये.

२१) निविदेतील कामा संबंधीच्या अधिक माहिती नगरपरिषद कार्यालयातील संबंधित विभागाकडे कार्यालयीन वेळीस सुट्टीच्या दिवसाखेरीज मिळु शकते.

२२) वरील कागदपत्रापैकी सर्व कागदपत्रे आवश्यक आहेत. त्यापैकी एकही कागदपत्रे सादर करता नाही आले तर सादर केलेली निविदा अपात्र ठरवून निविदा पत्रक उघडता येणार नाही.

२३) अ.क्र. ०१,०२ कामांना प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर कार्यादेश देण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

२४) अ.क्र. ०१,०२ कामांच्या सविस्तर शर्ती अटी नगरपरिषद आरोग्य विभागाकडे पाहावयास मिळतील त्यानुसार निविदा प्रक्रिया पुर्ण करणेची आहे.

२५) प्री-बिड मीटिंग दिनांक २२/०५/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता मुख्याधिकारी यांच्या दालनात होईल.

सर्वास कळावे, दिनांक – १८/०५/२०२६

कागल नगरपरिषद, कागल. स्थापना १९०९

मुख्याधिकारी
कागल नगरपरिषद कागल

Signature Not Verified
Digitally signed by SUNIL YASHWANT MALI
Date: 2026.05.19 14:58:56 IST
Location: Maharashtra-MH

Scanned with OKEN Scanner